# डॉ. आनंद बंग



महाराष्ट्र फाउंडेशनच्या विद्यमाने दि. १३ नोव्हेंबर २०१० रोजी रंगारंग कार्यक्रम संपन्न झाला. डॉ. आनंद बंग यांनी व्याख्यानाचे एक पुष्प गुंफिले. सुप्रसिध्द डॉ. अभय व सौ. राणी बंग यांचे सुपुत्र, डॉ. आनंद बंग, यांनी २००९ मधे Johns Hopkins school of health मधून MPH झाल्यावर मातापित्यांच्या लोकोत्तर कार्याचा वसा घेऊन गडचिरोली ही कर्मभूमी बनविली. सहज सुंदर सोप्या मराठी मायबोलीतून visual द्वारा विचार मांडताना पदोपदी प्रामाणिकपणा व पारदर्शकता यांचा प्रत्यय येत होता. स्थूलमानाने गोषवारा मांडण्याचा हा प्रयत्न!

गडचिरोली हा दुर्गम भाग मुंबईपासून एक हजार कि.मी. अंतरावर पूर्वेस आहे. अतिमागासलेला, अशिक्षित, बेरोजगार, अतिपीडित, नक्षलग्रस्त व आर्थिकदृष्ट्या दारिद्र्यरेषेखालील आदिवासींचा आहे. आनंदला मातापित्यांनी प्राथमिक शाळेत या भागात दाखल केले. पददलित सवंगड्यांबरोबर सहवास व सहशिक्षणामुळे बालपणी आनंदला सामाजिक बांधिलकीचा कित्ता गिरवण्याची संधी मिळाली. समाजाच्या चाली-रीती, रिवाज, रुढी, परंपरा, समजुती, श्रध्दा, अंधश्रध्दा आदिंचा परिचय झाला. ही शिदोरी नंतर कामाला आली.

या समाजाची सुधारणा आवश्यक आहे, असा ध्यास घेतल्यावर समाजाची समस्या, ज्वलंत प्रश्न, आव्हाने आदिंचा सर्वंकष अभ्यास, व्यवस्थापन व संशोधन अशी त्रिसूत्री कारवाई केली. स्थानिक मंडळींशी स्थानिक बोलीत संवाद साधल्यास जवळीक वाढते, हा ब्रीदमंत्र त्यांनी पाळला. झापाच्या झोपडीत वास्तव्य, वाघ किंवा अन्य वन्य प्राणी यांच्यापासून धोका म्हणून खिडक्या नाहीत, प्रकाश व स्वच्छ

मोकळ्या हवेचा अभाव, सोबत चोवीस तास गुरं, ढोरं, मेंढी-बकरी, रानडुकरं, गाई-म्हशी यांचा सतत सहवास, त्यामुळे मलमूत्र, सांडपाणी आदिंनी घाण व दुर्गंधीचे साम्राज्य, डास, मच्छर, पिसू, झुरळ यांचा उपद्रव, साथीला अतिरेकी तंबाखूसेवन. शेती व अन्य उत्पन्न नगण्य. बहुसंख्य मंडळी लकवा व हाताच्या रोगाने पीडित. त्यावर गावठी उपाय. जोडीला पिढ्यान्‌पिढ्या पारंपरिक मानसिकता - या चक्रव्युहातून बाहेर पडण्याचा एकमेव मार्ग म्हणजे परिवर्तन. परिवर्तन जादूची कांडी नाही. संवेदनशील व हळूहळू संथ गतीने पटणारी. अशा करामतीला, सामुदायिक व सामूहिक कार्याला विलंब लागतो. डॉ. आनंद बंग यांनी धीर सोडला नाही. नेटाने, समंजसपणे कार्य चालू ठेवले. इतर सामाजिक संस्था व शास्त्रीय मदतकार्याने कासव गतीने प्रगती होत आहे. मंडळीत आत्मविश्वास दुणावला आहे. दुर्धर-रोग-रहित जीवन जगावे अशी आशा पल्लवीत झाली आहे. हरवलेला आत्मसन्मान गवसला आहे. कार्याची व्याप्ती आणि विस्तार प्रचंड आहे. तेंव्हा डॉ. आनंद बंग या युवा कर्मयोग्याला मानवसेवा व्रत पाळण्यात शुभेच्छा!

शासनातर्फे मूलभूत सुविधा उपलब्ध केल्यास आणि विभाग प्रकल्प हाती घेतल्यास गडचिरोली बांधव मुख्य प्रवाहात येतील.

**रमेशचंद्र प्रधान, न्यू जर्सी**
**pradhandada@yahoo.com**